# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७ / चैत्र ८, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३)** | **कृषी आणि फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### मोळाचा ओढा ते गोडोली (जि.सातारा) रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(१) * ८३१५२ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोळाचा ओढा ते गोडोली (जि.सातारा) रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामास तीन वर्षापूर्वी मंजूरी मिळाली असून यातील मोळाचा ओढा ते करंजीनाका व महालक्ष्मी ते गोडोली पर्यंतच्या रस्त्याचे काम अपूर्ण असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील करंजे गावातून जाणारा रस्ता अरुंद असून या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असल्याने शाळेतील मुले व जेष्ठ नागरिकांना रस्ता ओलंडता येत नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्नांकित प्रकल्पाचे कामास रु. २३.२० कोटी इतक्या रकमेस मान्यता प्राप्त झाली आहे. प्रस्तुत काम मे.ऐ.एस.देसाई, सातारा या कंत्राटदारामार्फत प्रगती पथावर आहे. आजपर्यंत कामासाठी रु.२१.२० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

याकामापैकी करंजे गावामध्ये रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक जागा नगरपरिषद सातारा यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदर जागा अदयाप सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त झाली नसल्याने काम हाती घेणे शक्य झालेले नाही. यासाठी आवश्यक जमिनीचा ताबा प्राप्त करुन घेण्यासाठी जिल्हाधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांच्यामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे. भूसंपादन प्रक्रिया होवून जमिन ताब्यात आल्यावर करंजे गावातील रस्त्याचे काम व इतर उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामपूर (ता.राजूरा, जि.चंद्रपूर) येथील सर्वे कमांक ६६/२ या जागेच्या गैरव्यवहाराबाबत

**(२) * ७८७३५ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामपूर (ता.राजूरा, जि.चंद्रपूर) येथील सर्वे कमांक ६६/२ आराजी १.२२ हे.आर या जागेतील २९ प्लॉट शासनाची पूर्वपरवानगी न घेता अवैधरित्या गैरआदिवासींना विकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी राजूरा यांनी उक्त जागेतील सर्व जमीन शासनजमा करण्यात येत असल्याचे आदेश काढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी १०० कोटीहून अधिक रुपयांचा भूखंड गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) श्री. गणपत भिवा टेकाम या आदिवासीधारकाची मौजा रामपूर ता.राजूरा, जि.चंद्रपूर येथील सर्व्हे क्र. ६६/२ आराजी २.४४ हे.आर पैकी १.२२ हे.आर कृषिक जमीन निवासी प्रयोजनार्थ अकृषिक करण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दि. १०.१०.१९९७ च्या आदेशान्वये काही अटी व शर्तीसह परवानगी दिली होती.

उक्त जमिनीचे श्री. टेकाम यांनी प्लॉट पाडून गैरआदिवासी यांना नोंदणीकृत खरेदीखत करुन दिल्याचे दिसून आले, त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ३६ व ३६अ चे उल्लंघन झाल्यामुळे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या दि.२४.०६.२०१३ च्या आदेशान्वये उक्त दि.१०.१०.१९९७ चे अकृषिक परवानगीबाबतचे आदेश रद्द करण्याचे व महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम १९७४ व महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीत्तर व्यक्तींकडे भोगाधिकार हस्तांतरित करणे) नियम १९७५ अन्वये पुढील कार्यवाही करण्याचे उपविभागीय अधिकारी, राजूरा यांना निर्देश देण्यात आले.

वरील निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी, राजूरा यांच्या दि.२५.०४.२०१६ च्या आदेशान्वये उक्त जमीन सरकार जमा करण्यात आली आहे.

उक्त जमीन मूळ आदिवासीधारकास नियमानुसार प्रत्यार्पित करण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना सूचित करण्यात आले आहे.

-----------------

## डोमकानी व खुडाणे (ता.साक्री, जि.धुळे) येथे अतिवृष्टीमुळे पिकांचे व घरांचे झालेले नुकसान

**(३) * ८३४१०  श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :**  सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील डोमकानी व खुडाणे या भागात माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे डोमकानी शिवारातील घाटबारी पाझर तलाव फुटल्याने सुमारे ४०० ते ५०० एकर जमिनीवरील पिकांचे तसेच निजामपूर येथील ४० ते ५० घरांचे पुरामुळे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई मिळण्याबाबत तसेच पाझर तलावाचे पुन्हा बांधकाम करण्याबाबत अनेकदा पाठपुरावा करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करण्याचा स्थानिकांनी इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिकांचे व घरांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत व सदरहू पाझर तलावाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) पुरामुळे नुकसान झालेल्या २६ घरांकरिता प्रचलित नियमानुसार रु.९८८००/ इतकी मदत अपदग्रस्तांना वाटप करण्यात आलेली आहे. शेतपिकांच्या नुकसानीबाबतचा अहवाल विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडून प्राप्त झाल्यावर शासन निकषाप्रमाणे निधी वितरणाची तजवीज ठेवली आहे. तसेच सदर पाझर तलावाच्या दुरुस्तीबाबत लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, धुळे यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर व चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्ता व पुलाची झालेली दुरवस्था

**(४) * ८३३६९ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आरवली-माखजन या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे नागरिकांची वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने रस्त्याची दुरुस्ती करुन डांबरीकरण करण्याबाबत वारंवार मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तांबी नदीवरील पुलाची दुरवस्था झाल्यामुळे सदर पुलावरुन वाहतूक करणे धोकादायक झाल्याने सदर पुलाची पुनर्बांधणी करण्याची मागणी नागरीकांनी करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आरवली-माखजन या रस्त्याची दुरुस्ती व तांबी नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नांकित रस्ता आरवली-माखजन-करजुवे-डिंगणी-संगमेश्वर प्रजिमा ४३ चा भाग आहे. प्रश्नांकित रस्त्याच्या भागाची लांबी १० कि.मी. आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबरमिश्रित खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

(२) नाही.

पूलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. पूल वाहतूकीसाठी सुरक्षित आहे. पूलाच्या किरकोळ दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. ही कामे हाती घेवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीपैकी काही लांबीत मजबूती करणे व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तसेच तांबी नदीवरील पूलाची किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी,निधि, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चांगेवाडी (ता.खालापूर, जि.रायगड) या आदिवासी वाडीतील पूरग्रस्त कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(५) * ७९३४६ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांगेवाडी (ता.खालापूर, जि.रायगड) या आदिवासी वाडीत माहे जुलै, २०१६ मध्ये आलेल्या पूरामध्ये नुकसान झालेल्या आदिवासी कुटुंबांना अद्यापपर्यंत नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार पूरग्रस्त आदिवासी कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) दि.१८.७.२०१६ रोजी पर्जन्यामुळे एकूण ३ कच्चे घरांचे नुकसान झालेले आहे. नुकसानग्रस्त घरांकरिता दि.१३.५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेले प्रती घर रक्कम रु.५२००/- याप्रमाणे आपदग्रस्तांना वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील केळी उत्पादकांना पीक विमा परताव्याची रक्कम न मिळाल्याबाबत

**(६) * ८३००२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील ८ हजार १८८ केळी उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०१५-१६ करीता ६९ कोटी ९२ लाख ५२ हजार रुपयांच्या पीक विम्यासाठी ४ कोटी १९ लाख ६१ हजार १३० रुपयांचा हप्ता भरला असतांना शेतकऱ्यांना नुकसान

भरपाईसाठी विमा कंपन्यांनी केवळ २ हजार ८८१ शेतकऱ्यांनाच ३ कोटी २४ लाख ८० हजार ८१ रुपये दिले असून ५ हजार ३०७ शेतकऱ्यांना पीक विमा परतावा नाकारला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मा.कृषी राज्यमंत्री यांनी दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास सर्व संबंधीत कृषी अधिक्षक, संबंधित शेतकरी व विमा कंपन्यांचे अधिकारी यांची बैठक घेवून यासंदर्भात चौकशी करुन एक महिन्यात अहवाल तयार करण्याचे निदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निदेशानुसार याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे काय व अहवालातील निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हवामान आधारीत पीक विमा योजना सन २०१५-१६ मधील आंबिया बहार हंगामात नांदेड जिल्हयातील ८१८८ शेतकऱ्यांनी केळी पिकाचा विमा केलेला होता. त्याकरिता रु.६९.९३ कोटी विमा संरक्षीत रक्कम होती.

दि.०३/१२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये व २२/०१/२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये अधिसूचित केलेली हवामानाची प्रमाणके व संदर्भ हवामान आकडेवारीनुसार पात्र २८८१ शेतकऱ्यांना केळी पीकासाठी रु.३.२५ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत संबंधित बँकांच्या खात्यावर दिनांक १० ते १३ ऑक्टोबर २०१६ रोजी जमा करण्यात आलेली आहे. उर्वरीत ५३०७ शेतकरी योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार नुकसान भरपाईस पात्र ठरत नसल्याने विमा कंपनीकडून नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

-----------------

**कळवण (जि.नाशिक) येथील बसस्थानकाच्या नुतनीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(७) * ८१६९८ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) येथील बसस्थानकाच्या नुतनीकरणाचे काम सुरु असून या नुतनीकरणातंर्गत प्रवाशी शेड बांधणे, बसस्थानकावर फरशी बसविणे व शेडच्या भिंतीचे बांधकाम करणे इत्यादी कामे करण्यात येत आहेत. सदरहू कामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असल्याबाबतची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करण्यास जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) सदर बसस्थानकाचे नुतणीकरणाचे काम सुरु असून काम निकृष्ट दर्जाचे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### अमरावती (जि.अमरावती) तालुक्यातील महापुरांमुळे बाधीत झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(८) * ७७०२५ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती (जि.अमरावती) तालुक्यातील पुसदा, देवरी, सालोरा, बु. देवरा, रेवसा, शिराळा, टेंभा, फाजलपुर, थुगाव, वलगाव या गावांत सन २००७ मध्ये आलेल्या महापुरांमुळे बाधीत झालेल्या कुटुंबांचे अद्यापही पूर्णत: पुनर्वसन झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांमध्ये नागरी सुविधांची कामे अपूर्ण असून पुनर्वसनाकरिता १३.६२ कोटी रुपये एवढ्या निधीची आवश्यकता असल्याने लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री सार्वजनिक बांधकाम, उद्योग, पर्यावरण यांना प्रत्यक्ष भेटून दिनांक १३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास यासंदर्भात लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने पुनर्वसनाकरिता १३.६२ कोटी रुपये निधी मंजुर करुन या गावांतील नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.
(३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडून निधी मागणीचा प्रस्ताव प्राप्त होताच निधी वितरणाची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयातील तुळजाभवानी जिल्हा दुधसंघाचे अवसायक यांनी केलेला गैरव्यवहार

**(९) * ८२५६७ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयातील तुळजाभवानी जिल्हा दुधसंघावर शासनाकडून नेमलेल्या अवसायक यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी मा.दुग्धविकास मंत्री यांना दिनांक ०३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊन तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी अवसायक यांनी संघाची कोणतीही जंगम अथवा स्थावर मालमत्ता विकण्यासंदर्भात परस्पर कोणताही व्यवहार केलेला नाही. तसेच विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद कार्यालयाने यासाठी कोणतीही मान्यता दिलेली नाही.

सदर संघाचे सन २०१५-१६ चे लेखापरिक्षण प्रलंबित आहे. तुळजाभवानी जिल्हा दुध संघाच्या दि.२५.१०.२०१६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी दि.२.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये विशेष कार्य अधिकारी, लेखापरिक्षण मंडळ (पदुम), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना लेखापरिक्षक नियुक्तीबाबत कळविलेले आहे. दि. ६.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये श्री. एस. आर. नाईकवाडी, यांची अवसायक म्हणून नियुक्ती केलेली असून त्यांनी दि.१०.१०.२०१६ रोजी पदभार स्विकारलेला आहे. दूध संघाकडे असलेली उस्मानाबाद येथील इमारत सुस्थितीत असून कळंब व परांडा येथील मालकीच्या जागेत बसविलेले चिलिंग प्लँट मशनरी संघाचे मालकीच्या जागेत बसविलेले आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाकडून प्राप्त लाभांश रक्कम रु. ६.७१ लाख या निधीतून दोन्ही सेंटरची मशनरी सुमारे ६ लाख रुपये खर्चुन अद्ययावत करुन घेतली आहे. परांडा येथील सेंटर पूर्णपणे सुस्थितीत करुन लवकरच कार्यान्वित होणार आहे. कळंब येथील प्लांटसाठी आणखीन सुमारे ३ लाख रुपये खर्च अपेक्षित असून ते काम पूर्ण करुन लवकरच तोही प्लांट सुरु करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

संघाचे लेखापरिक्षण सन २०१४-१५ पर्यंत पूर्ण झाले असून दि.३१.३.२०१५ अखेर संघाच्या कर्मचाऱ्यांचे व संस्था ठेकेदार यांचे एकूण ३.७५ कोटी रुपये देणे आहे.

(३) अवसायकाकडून गैरव्यवहार झाल्याने निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे अवसायकाविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उदगीर-बिदर (ता.उदगीर, जि.लातूर) या आंतरराज्य मार्गाला जोडणा-या उदगीर-नळेगाव-आष्टा-मोड या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(१०) * ८२४२८ श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर-बिदर (ता.उदगीर, जि.लातूर) या आंतरराज्य मार्गाला जोडणाऱ्या उदगीर-नळेगाव-आष्टा-मोड या ३५ किलोमीटरच्या रस्याची दुरवस्था झाली असून

रस्त्याच्या साईड पट्ट्याही खचलेल्या असल्याने वाहनचालकांना वाहने चालविणे अडचणीचे ठरून अपघाताच्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्याचे खडीकरण तसेच डांबरीकरण करण्याबाबत तेथील ग्रामस्थांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व मा.पालकमंत्री यांच्याकडे गत ३ वर्षापासून सातत्याने मागणी करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामस्थांच्या मागणीच्या अनुषंगाने या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रश्नांकित रस्ता रामा २४५ आहे.या रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर काही ठिकाणी खड्डे पडले होते. ते आता डांबर मिश्रीत खडीने भरण्यात आले आहेत. या रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीपैकी १.५० किमी लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. १३.९०० किमी लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर असून हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे. रस्त्यावरील अपघातांच्या संख्येत वाढ झालेली नाही.

(२) नाही.

(३) प्रश्नांकित रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.६३ म्हणून घोषित झाला आहे. या रस्त्याची सुधारणा व दुरूस्ती केंद्र शासनामार्फत होणे अपेक्षित आहे. केंद्र शासनाकडे रस्ता हस्तांतरीत (entrustment) होत नाही तोपर्यंत रस्त्याची देखभाल व दुरूस्ती सा.बां.विभागामार्फत करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तळेगाव-बळेगाव (ता.उमरी, जि.नांदेड) येथे मुरुमाचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याबाबत**

**(११) * ८१६९२ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव-बळेगाव (ता.उमरी, जि.नांदेड) या रस्त्यावरील तळेगाव शिवारातील सर्वे नं.१६० ला लागून असलेल्या पर्वताचे जे.सी.बी.मशीनच्या सहाय्याने अवैधरीत्या खोदकाम केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या तीसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी केवळ १०० ब्रास मुरुमाच्या उत्खननाची रॉयल्टी असताना हजारो ब्रास मुरुमाचे उत्खनन स्थानिक प्रशासनाच्या संगनमताने करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी अवैध उत्खनन करणाऱ्यांवर तसेच त्यास मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) "मुरूमासाठी अवैधरित्या डोंगर पोखरला" अशा आशयाची बातमी एका वृत्तपत्रात दि. १९.०१.२०१७ रोजी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, तळेगाव शिवारातील डोंगराचे खोदकाम होत असल्याचे तसेच १०० ब्रास मुरूमाच्या उत्खननाच्या परवानगीवर हजारो ब्रास मुरूम उत्खनन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोणार-मेहकर (जि.बुलढाणा) येथील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(१२) * ८१४३७ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार-मेहकर (जि.बुलढाणा) येथील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सुरु असलेल्या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारावर व संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) तक्रार प्राप्त नाही.

तथापि, स्थानिक वृत्तपत्रात प्रश्नांकित कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२), (३) व (४) प्रश्नांकित बाबी बाबत तपासणी करण्याचे आदेश अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, अमरावती यांना देण्यात आले आहेत.

-----------------

## पुणे जिल्हयात मुरुम व रेतीचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(१३) * ८३०७५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील विविध ठिकाणच्या शासकीय जमिनीवर ठेकेदारांनी तसेच व्यावसायिकांनी मुरुमाचे अवैधरीत्या उत्खनन करून शासनाचा महसूल बुडविल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील पाचगाव पर्वती, वाघोली केसनंद, बावधन, वारजे, चांदणी चौक या भागात पोकलेन मशिनच्या सहाय्याने अवैधरित्या रेती उपसा होत असल्याचेही दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार रेती व मुरुमाचे अवैध उत्खनन करून शासनाचा महसूल बुडविणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) हवेली तालुक्यातील विविध ठिकाणच्या शासकीय जमिनीवर ठेकेदारांनी तसेच व्यावसायिकांनी मुरूमाचे अवैधरित्या उत्खनन करून शासनाचा महसूल बुडविल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, माहे डिसेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ दरम्यान हवेली तालुक्यातील विविध ठिकाणच्या खाजगी जमिनीवर गौण खनिजाच्या अवैध उत्खननाची ०७ प्रकरणे निदर्शनास आली आहेत. त्यापैकी ६ प्रकरणांमध्ये तहसिलदार, हवेली यांच्यास्तरावर कार्यवाही सुरू असून, १ प्रकरणामध्ये रु.४,२९,९०६/- एवढा दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच हवेली तालुक्यामध्ये माहे डिसेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ दरम्यान गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीबाबत आढळून आलेल्या १४ वाहनांवर कारवाई करून रु.४,७६,२२०/- एवढा दंड वसूल करण्यात आलेला आहे.

पुणे जिल्हयातील मौजे पाचगाव, पर्वती, वाघोली, केसनंद, ता. हवेली व मौजे बावधन, वारजे, चांदणी चौक, ता. मुळशी येथे पोकलेन मशिनच्या सहाय्याने रेतीचा अवैधरित्या उपसा होत असल्याचे दि.१६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वणौशी-संगलट-कोरेगाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(१४) * ८२६८३ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणौशी-संगलट-कोरेगाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे रस्त्यावरील खडी पूर्णत: उखडली असून रस्त्यावरुन प्रवास करने वाहनचालकांना अडचणीचे ठरुन अपघात होऊन जीवित व वित्त हानी होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून उक्त कामासाठी प्राप्त झालेल्या ५० लाख रुपयांच्या निधीचा ठेकेदाराकडून योग्य प्रकारे विनियोग करण्यात आला नसल्याने सदर कामाच्या दर्जाची चौकशी करण्याची मागणी संगलट येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या कामाचा दर्जा सुधारण्याबाबत तसेच रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

तथापि प्रश्नांकित रस्त्याच्या काही लांबीमध्ये मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम प्रगतीत असताना, रस्त्यावरील वाहनांच्या वाहतूकीमुळे बी.बी.एम. काही ठिकाणी क्षतिग्रस्त झाला होता. तो ठेकेदारांनी दुरुस्त केला होता. बी.बी.एम.चे काम स्वीकृत निविदेतील विनिर्देशाप्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे. काम प्रगतीपथावर आहे. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीतपणे चालू आहे. या भागातील अपघातात कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

(२) निवेदन प्राप्त आहे.

(३), (४) व (५) ठेकेदारांनी केलेले काम स्वीकृत निविदेतील तरतूदीप्रमाणे केले आहे. काम सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत चालू आहे.

-----------------

**उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान मिळण्याबाबत**

**(१५) * ८३४५८ श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांवर दुष्काळी परिस्थिती असताना सुध्दा शेतकऱ्यांनी पैसे उसनवारी घेऊन व कर्ज काढून शासनाच्या हरीतगृह, शेडनेट, शेततळे, स्पील, पॅक हाऊस, कांदा चाळ, यांत्रिकीकरण, जरबेरा लागवड इत्यादी योजना सन २०१५-१६ या वर्षात राबविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजना सक्षमपणे राबवूनही अद्यापपर्यंत या विविध योजनांचे शासनाकडे प्रलंबित असलेले एकूण १८ कोटी रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांना मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अनुदान शेतकऱ्यांना लवकरात लवकर द्यावे अशी विनंती लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री व मा.कृषी मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१), (२), (३), (४) व (५) उस्मानाबाद जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये, राष्ट्रीय कृषि विकास योजना व एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान राबविण्यात आलेले असून, राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत रु.८०६.१० लाख व एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत रु.८८४.३६ लाख निधीचे वितरण करण्यात आले आहे.

उस्मानाबाद जिल्हयातील विविध कृषी योजनांचे सुमारे रु.१८ कोटी प्रलंबित अनुदान अदा करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी, मा.कृषी मंत्री महोदयांना दि.२०.०२.२०१७ रोजी विनंती केली आहे.

उस्मानाबाद जिल्हयातील प्रलंबित अनुदानाकरीता एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत रु.३०५.८६ लाख निधी वितरीत करण्यात आलेला असून, राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत नियंत्रित शेती या घटकासाठी रु.१०४७.०० लाख निधी वितरीत करण्यात येत आहे.

-----------------

### नांदुरा (ता.नांदुरा, जि.बुलडाणा) शहरासाठी बाह्य वळणरस्ता (बायपास) बांधण्याबाबत

**(१६) * ८०७४६ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा (ता.नांदुरा, जि.बुलडाणा) शहरातून जाणाऱ्या राष्टीय महामार्ग क्रमांक सहासाठी बाह्य वळणरस्ता (बायपास) अद्यापपर्यंत न करण्यात आल्यामुळे या महामार्गावरील वाहतूक शहराच्या मध्यवर्ती भागातून होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड तसेच इतर वाहनांची वाहतूक होत असल्यामुळे शहरातील अपघातांच्या प्रमाणात वाढ होऊन अनेक नागरिक गंभीर जखमी तर अनेकांना आपला जिव गमवावा लागला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार नांदुरा शहरातून जाणाऱ्या राष्टीय महामार्ग क्रमांक सहासाठी बाह्य वळणरस्ता (बायपास) बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) नांदुरा शहरामध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वर सन २०१६ मध्ये ७ अपघात झाले असून ३ गंभीर जखमी तर ४ व्यक्ती मयत झाले असल्याचे पोलीस अधीक्षक, बुलडाणा यांनी कळविले आहे.

सद्यस्थितीत गावातील रस्त्यावरुन वाहतूक होत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(३) व (४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत अमरावती ते चिखली या १९४ कि.मी. लांबीच्या चौपदरीकरणाचे काम प्रगतीत आहे. सदर लांबीत नांदुरा बाहयवळण ६ कि.मी.लांबीचा समावेश आहे. तसेच सदरचा प्रकल्प मे २०१९ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आजरा (बंदर) वरवडे-कणकवली-कनेडी-फोंडा-उंबर्डे या रस्त्याच्या कामाबाबत**

**(१७) * ७३८८१ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आजरा (बंदर)-वरवडे-कणकवली-कनेडी-फोंडा-उंबर्डे या राज्यमार्ग क्र. ८१ वरील साखळी क्रमांक ३३/८०० ते ३६/८०० या रस्त्याच्या कामासाठी सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात ४ कोटी ९५ लाख ८ हजार रुपयांची तरतूद करण्यात येऊनसुद्धा अद्याप सदर रस्त्याचे काम सुरु झाले नसल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामास निधी प्राप्त होऊनही काम सुरू न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रश्नांकित साखळी क्र. ३३/८०० ते ३६/८०० या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनाच्या प्रक्रीयेसाठी रु.३२१ लक्ष रकमेचे काम मंजूर असून त्यापैकी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात भूसंपादनाच्या कामासाठी रु. ६३.४४ लक्ष एवढी तरतूद आहे. भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे. भूसंपादन झाल्यावर रस्त्याचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (ता.महाड, जि.रायगड) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकाची झालेली दुरवस्था

**(१८) * ७७६३४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (ता.महाड, जि.रायगड) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकाची दुरवस्था झाली असून या इमारतीचे अनेक ठीकाणी बांधकाम पडल्याचे व खिडक्यांची तावदाने तुटल्याचे तसेच मोठया प्रमाणात छतातून पाणी

झिरपत असल्याने छत धोकादायक झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी व प्रवाशांच्या जिवीताला धोका निर्माण झाला असल्याने बसस्थानक कर्मचारीवर्गाने या इमारतीच्या दुरवस्थेबाबत आंदोलन करुनही संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बसस्थानकाच्या इमारतीची पाहणी करून इमारतीची तात्काळ दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) महाड येथील आगाराची इमारत जुनी झाली असून, इमारतीची वेळोवेळी आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्यात येते. छतातून पाण्याची गळती होत नाही.

(२) व (३) महाड आगारातील कर्मचाऱ्यांनी ज्या-ज्या वेळी दुरुस्तीबाबत निदर्शनास आणले, त्या-त्या वेळी प्रशासनाने इमारतीची दुरुस्ती केलेली आहे. महाड येथे अद्ययावत सोयी - सुविधांनी युक्त असे नवीन बस स्थानक बांधण्याबाबत निविदा प्रक्रिया राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील बोरी नदीवरील पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(१९) * ७७४०१ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील बोरी नदीवरील पुलाचे बांधकाम ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे केल्याने पुलाला तिसऱ्यांदा मोठा खड्डा पडल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बोरी नदीवरील पुलाची दुरुस्ती गुणदर्शक तत्वानुसार करण्याबाबत तसेच पुलाचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्नांकित पुलाचे नजीक असलेल्या जुन्या पुलाचे आयुष्यमान १०० वर्षे झाले आहे. या पुलाचे ठिकाणी नवीन पूल बांधण्यात आला आहे. नवीन पूल सन २०१५ मध्ये बांधण्यात आला आहे. सप्टेंबर २०१६ मध्ये तामसवाडी धरणातून पाण्याचा विसर्ग केल्याने नदीला मोठा पूर येवून पुलाच्या जोडरस्त्या मधील मोरी व भराव काही ठिकाणी क्षतिग्रस्त झाला होता. क्षतिग्रस्त भराव व मोरीची दुरूस्ती ठेकेदारांकडून त्यांच्या खर्चाने करून घेण्यात आली आहे. पूल सुस्थितीत असून पूल व रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे.

-----------------

**मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावातील नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(२०) * ७४९२० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावातील फणसवाडी, पायरवाडी व गायकरवाडी या वाडयांची वस्ती नदीपलीकडे असल्याने पावसाळयात नदीच्या पाण्याची पातळी वाढल्यानंतर ग्रामस्थांना जीर्ण व धोकादायक झालेल्या लोखंडी साकवावरून नदी ओलांडावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यातील अतिवृष्टीमध्ये सदर लोखंडी साकवावरून पाणी वाहत असल्यामुळे ग्रामस्थांना पूल ओलांडता येत नसून या गावाचा इतर गावांशी असलेला संपर्क तुटत असल्यामुळे उक्त ठिकाणी पूल बांधण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त ठिकाणी पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३), (४) व (५) विषयांकित साकव जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे अखत्यारितील असून साकव दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत सदर साकवाचे दुरुस्तीचे काम मंजूर आहे.

-----------------

## भारतीय क्रिकेट नियामक मंडळ खेळांडूबरोबरच्या करारांची नोंदणी मुद्रांक कार्यालयात करत नसल्याबाबत

**(२१) * ७४३६१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये कोणताही करार झाल्यानंतर तो नोंदणी व मुद्रांक विभागाकडे नोंदविणे व त्यापोटी मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक असतांना भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) क्रिकेट स्पर्धांसाठी खेळांडूबरोबर केलेले करार नोंदवित नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त करार नोंदणी व मुद्रांक विभागाकडे नोंदविण्यात येत नसल्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाचा महसूल बुडवणाऱ्या बीसीसीआय व्यवस्थापनावर कारवाई करण्याबाबत तसेच करारापोटीचा महसूल वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) भारतीय नोंदणी अधिनियम १९०८ च्या कलम १८ मधील तरतूदीनुसार, क्रिकेट स्पर्धेसाठी खेळणाऱ्या खेळाडूंबरोबर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ यांनी केलेल्या करारनाम्यांची नोंदणी वैकल्पिक स्वरुपाची असल्याने, असे करार नोंदणी विभागाकडे नोंदविणे अनिवार्य नाही.

मात्र महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतूदीनुसार अशा करारास मुद्रांक शुल्क लावणे बंधनकारक आहे. त्यामुळे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ यांनी क्रिकेटपटू व इतर संस्था/व्यक्ती यांचेबरोबर केलेल्या करारांचे दस्त भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून हस्तगत करण्याची कार्यवाही मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी क्र.२ यांचे स्तरावर सुरु आहे. यासाठी अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई तसेच मुद्रांक जिल्हाधकारी, अंमलबजावणी क्र.२ यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ यांना उक्त दस्त मुद्रांक शुल्काच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी नोंदणी व मुद्रांक कार्यालयास सादर करण्याबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(२२) * ७६२३० श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत एकूण १००३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन त्यापैकी सर्वाधिक आत्महत्या विशेषत: मराठवाड्यातील बीड मध्ये २१४ झाल्या असून नांदेड मध्ये १७०, उस्मानाबाद मध्ये १५३, औरंगाबाद मध्ये १४५, लातूर मध्ये १०८, जालना, परभणी व हिंगोली या जिल्ह्यांमध्येही शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण अधिक असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्येत होत असलेली वाढ रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी जिल्हास्तरांवरून चौकशी करून पात्र प्रकरणी दिनांक २३ जानेवारी, २००६ शासन निर्णयातील तरतूदींनुसार रु.१.०० लक्ष इतकी आर्थिक मदत अदा करण्यात आली आहे. तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी पथदर्शी विशेष कार्यक्रम उस्मानाबाद व यवतमाळ जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे व कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुर्नरचना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कृषी उद्योग महामंडळाची कृषी विभागाकडे कोट्यवधी रुपयांची थकबाकी असल्याबाबत**

**(२३) * ८००५५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना अनुदानावर पुरविण्यात येणाऱ्या अवजारांसाठी लाभार्थी हिस्सा म्हणून शेतकऱ्यांकडून कृषी विभागाकडे भरण्यात आलेली ९८ कोटी रूपयांची रक्कम कृषी विभागाकडे थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी उद्योग महामंडळाने थकीत रक्कमेबाबत वारंवार शासनाकडे मागणी करूनही शासनाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, थकीत रक्कमेमुळे महामंडळास आपली विकास कामे करता येत नसल्यामुळे महामंडळाची थकीत रक्कम तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) कृषि विभागाकडे अनुदानाची रु.२२.६४ कोटी व लाभार्थी हिश्श्याची रु.३३.२४ कोटी अशी एकूण रु.५५.८८ कोटी एवढ्या रक्कमेची महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाची थकबाकी आहे.

(२) व (३) आयुक्त (कृषी) यांनी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व कृषी विकास अधिकारी जिल्हापरिषद तसेच पुरवठा संस्थेचे प्रतिनिधी यांचेसमवेत तात्काळ मोहिम हाती घेवून सर्व थकीत रक्कमांचा ताळमेळ तात्काळ घालून प्रलंबित देयकांची अदायगी करण्याचे निर्देश सर्व विभागीय कृषी सहसंचालकांना दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आग्री-पिपरा-झारली (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(२४) * ८०४७४ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आग्री-पिपरा-झारली (ता.तुमसर, जि.भंडारा) या रस्त्याच्या व रस्त्यावरील पुलाच्या बांधकामासाठी सन २००१ मध्ये संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना अद्याप मिळाला नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत प्रस्ताव तयार करण्यात आला असून, सदर जमिनीच्या भुसंपादनाचा मोबदला संबंधीत शेतकऱ्यांना अदा करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई व जुन्नर तालुक्याला जोडणाऱ्या दऱ्या घाटातील रस्त्याच्या बांधकामाबाबत**

**(२५) * ७५६४९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व जुन्नर तालुक्याला जोडणारा दऱ्या घाट फोडून रस्ता तयार करण्यात यावा अशी परिसरातील नागरिकांची मागणी असून सन १९९५ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी व उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत या रस्त्यांचे भूमीपूजनही झाले होते परंतु अद्यापी सदर रस्त्याच्या कामास सुरूवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यामुळे मुंबईपासून जुन्नर अवघ्या ६० किमी अंतरावर येणार असून सदर रस्ता नगर, नाशिक व पुणे जिल्हयाला जोडणारा पर्यायी रस्ता ठरणार असल्याने सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २५ मे, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, पुणे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन होवून २१ वर्षाचा कालावधी झाल्यानंतरही सदर रस्त्याच्या कामास सुरूवात न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

दऱ्याघाट कृती समितीचे अध्यक्ष यांनी १९ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या पत्राव्दारे निवेदन सादर केले आहे.

(३), (४) व (५) प्रश्नांकित घाट रस्ता उमरोली-धसई-पळु या प्रजिमा ७८ चा भाग आहे. घाट रस्त्याची लांबी १९.९३ कि.मी. आहे. या लांबीपैकी २.७६ कि.मी. लांबीतील काम पुर्ण झाले आहे. उर्वरीत लांबीतील घाट रस्त्याचे सर्वेक्षण व प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी रु. १५० लक्ष रकमेचे काम मंजूर असून या

कामासाठी सल्लागार नेमणुकीचे काम निविदास्तरावर आहे. सर्वेक्षण व प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यावर काम मंजुरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## गगनबावडा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील करूळ व भुईबावडा घाटातील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२६) * ७६४७१ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गगनबावडा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील करूळ व भुईबावडा घाट हा कोल्हापूर व तळकोकणला जोडणारा महत्वाचा मार्ग असून गतवर्षीच्या पावसाळ्यात करूळ व भुईबावडा घाटात १७ वेळा दरड कोसळली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घाटात अनेक नागमोडी वळणे असून घाटातील रस्त्याचे संरक्षक कठडेही तुटलेले आहेत तसेच कड्यावरून छोटे मोठे दगड पडत असतात त्यामुळे वाहन चालकांना वाहन चालविणे धोकादायक झाले असून प्रवाशांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने करुळ व भुईबावडा घाटातील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच सदर घाटातील रस्त्यावर दरड कोसळू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

अतिवृष्टीमुळे घाटामध्ये काही ठिकाणी दरडी कोसळल्यामुळे घाट काही तासांसाठी बंद होतो. या दरडी दूर करुन वाहतूक सुरळीत सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(२) नाही.

(३), (४) व (५) दरडी कोसळल्यामुळे नादुरुस्त झालेल्या संरक्षक भिंतीची दुरुस्ती करण्यात आली आहे. क्षतिग्रस्त झालेल्या डांबरी पृष्ठभागाची दुरुस्ती करण्याचे काम प्रगतीत आहे.

प्रश्नांकित रस्त्यापैकी तरळा जंक्शन ते कोल्हापूर या लांबीतील रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून केंद्र शासनाने तत्वत: (In Principal) घोषित केला आहे. केंद्र शासनाकडे रस्ता हस्तांतरण (entrustment) होईपर्यंत सा.बा. विभागामार्फत दुरुस्ती देखभाल करण्याचे प्रयोजन आहे.

-----------------

**आडूर (ता.करवीर, जि.कोल्हापूर) या गावातील गायरान जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(२७) * ७७८८६ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आडूर (ता.करवीर, जि.कोल्हापूर) या गावातील कोल्हापूर-गगनबावडा मार्गालगतच्या ३५ एकर गायरान जमिनीवर गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व इतर १७७ ग्रामस्थांकडून अतिक्रमण करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे आडूर ता. करवीर येथील ग्रामस्थ यांनी दिनांक १७/११/२०१६ रोजी तहसिलदार, करवीर यांचे कार्यालयास दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून मौजे आडूर येथील गायरान ग.नं.९ व ग.नं.१० मध्ये अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार सदर जागेतील सर्व अतिक्रमणधारक यांचेवर फिर्याद दाखल करणेबाबत ग्रामसेवक, आडूर यांना तहसिलदार, करवीर यांनी दि.०४/०१/२०१७ च्या पत्रान्वये सूचित केल्यानुसार ग्रामसेवक, आडूर यांनी गायरान जागेमध्ये अतिक्रमण केलेल्या १६८ लोकांविरूद्ध करवीर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या प्रत्येक बसस्थानकावर जेनेरिक औषधाचे दुकान सुरु करण्याबाबत

**(२८) * ७४१७४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.संजय सावकारे (भुसावळ), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरजू रुग्णांना स्वस्त औषधे उपलब्ध करुन देण्याकरीता राज्य परिवहन महामंडळाच्या प्रत्येक बसस्थानकावर जेनेरिक औषधांचे दुकान सुरु करण्याचा निर्णय मा.परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष यांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि बी.पी.पी.आय. यांच्यात बसस्थानकांवर जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक बसस्थानकावर जेनेरिक औषधांची दुकाने तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.

(३) राज्य परिवहन महामंडळाच्या ५९७ बसस्थानकांवर जेनेरिक औषध विक्री सुरु करण्याबाबतच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम (जि.वाशिम) येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(२९) * ८३२९६ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम (जि.वाशिम) येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाचे गत २ वर्षापासुन सुरु असलेले बांधकाम सार्वजनीक बांधकाम विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे अदयापी अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी अद्यापपावेतो २० कोटी रुपायांचा निधी खर्च करण्यात आला असून या रुग्णालयाचे माहे मार्च, २०१६ पर्यत लोकार्पण होणे अपेक्षीत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच रुग्णालयाचे बांधकाम अपूर्ण राहण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) सदर कामावर रु.२१.२६ कोटी आजपावेतो खर्च झाला आहे. परंतु मार्च-२०१६ पर्यंत लोकार्पण होणे अपेक्षित होते हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भोर (जि.पुणे) तालुक्यात अवैधरीत्या गौण खनिजांचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(३०)** * **८२३२९** **श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सातारा महामार्गावरील कंरदी, खेडेबारे (ता.भोर, जि.पुणे) येथील माळरान व छोटया टेकडयांवर तसेच नीरादेवधर व भाटघर धरण परिसरात मोठया प्रमाणात अवैधरीत्या गौण खनिजांचे उत्खनन होत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या निर्बंधामुळे नागरिक, शेतकरी, मजुरांना घरांसाठी व शेतीच्या बांधासाठी लागणारा मुरुम-माती मिळणे कठीण झाले असताना गौणखनिज माफिया मात्र अवैधरितीने रॉयल्टीपेक्षा जादा मालाची वाहतूक व उत्खनन करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या नागरिकरणामुळे गौण खनिजांना अवाजवी भाव मिळत असल्याने महसूल यंत्रणा ऑनलाईन कामात व्यस्त असल्याचा फायदा वाळूमाफिया घेत असल्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून सदर अवैध उत्खाननाकडे महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी अवैध उत्खनन करणाऱ्यांवर तसेच या अवैध उत्खननाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) भोर तालुक्यातील नीरादेवधर व भाटघर धरण परिसरात गौण खनिजांचे अवैध उत्खनन होत असल्याचे दि.१३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले नाही.

भोर तालुक्यातील मौजे करंदी खेबा येथे मातीचे अनधिकृत उत्खनन केल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे. त्यानुसार तहसिलदार, भोर यांनी संबंधितांना नोटीसा बजाविल्या असून, सदर प्रकरणी चौकशीअंती नियमानुसार कार्यवाही करण्याची तजविज ठेवली आहे.

मुरुम-माती उत्खननास विहित कार्यप्रणालीचा अवलंब करुन सक्षम प्राधिकारी परवानगी देत असतात. भोर तालुक्यात सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात माती/मुरुम उत्खननाच्या परवान्यासाठी १५२ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १३० अर्जांना परवाना मंजूर करण्यात आलेला आहे.

गाव नमुना नंबर ७/१२ संगणकीकरणाच्या कामात व्यस्ततेमुळे गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक होत असल्याची बाब निदर्शनास आली नसून, पुणे जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरांवर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. सदर पथकांमार्फत वेळोवेळी तपासण्या करण्यात येतात. सदर पथकांनी माहे, एप्रिल २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत केलेल्या तपासणीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या १७५१ प्रकरणांमध्ये कारवाई करुन रु.७,३४,००,०००/- एवढी दंडात्मक रक्कम वसूल करुन शासनजमा केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्हयातील तापी नदीवर नवीन पूल बांधुन बुधगांव जलोद येथील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(३१) * ८३६७८ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेडी भोकरी (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील तापी नदीवर दरवर्षी जानेवारी महिन्यात हंगामी पूल तयार करुन जून महिन्यात काढण्यात येत असल्यामुळे ऊक्त नदीवर कायम स्वरुपी पूल बांधण्याबाबत नागरीकांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बुधगांव जलोद (जि.जळगांव) येथील पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधिंनी मा.मंत्री महोदयाकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने खेडी भोकर येथे तापी नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत व बुधगांव जलोद येथील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) प्रस्तूत प्रकरणी बुधगाव जलोद पुलालगतच्या रस्त्याच्या दुरुस्तीसंदर्भात कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे महामंडळ, जळगाव यांचेकडे दि.१४.१२.२०१५ चे पत्र प्राप्त झाले आहे.

(३), (४) व (५) तापी नदीवरील खेडी भोकर येथे पुलाचे बांधकाम करण्याचे काम निकष, मंजुरी व निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

बुधगाव जलोद येथील पूल जलसंपदा विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानंतर जलसंपदा विभागाने निधी दिल्यानंतर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल.

-----------------

**आगर आणि मासोली (ता.डहाणू, जि.पालघर) या भागात समुद्राच्या भरतीचे क्षारयुक्त पाणी शिरुन भातशेती नापिक झाल्याबाबत**

**(३२) * ८२०२० श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील डहाणू नगरपालिका क्षेत्रांतर्गत आगर आणि मासोली या क्षेत्रात मोठया भरतीच्या वेळी समुद्राचे क्षारयुक्त पाणी शिरुन भातशेती नापिक झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार भात शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळात झालेला गैरव्यवहार**

**(३३) * ८३००४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांनी रत्नपुरी मळा (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील शेती संक्रमण शेती अंतर्गत करार पध्दतीने, खंडाने देण्यामध्ये गैरव्यवहार करुन करोडो रुपयांच्या महसूलाची हानी केल्याप्रकरणी मा.विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी व माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री व प्रधान सचिव, महसूल विभाग यांचेकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.महसूल मंत्री व विभागीय आयुक्त, पुणे यांनी व्यवस्थापकीय संचालकांच्या चौकशीचे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.महसूल मंत्री व विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ व इतर संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या रत्नपुरी मळयातील जमीनीच्या संयुक्त शेती करारामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २७/६/२०१६ व दिनांक ११/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांना स्वतंत्रपणे चौकशी करुन चौकशी अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

(३), (४) व (५) मा. विरोधी पक्षनेता यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांनी चौकशी करून अहवाल शासनास सादर केलेला आहे. विभागीय आयुक्त, पुणे यांनी सादर केलेला चौकशी अहवाल विचारात घेवून शासनस्तरावर पुढील उचित निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

----------------

## वलगांव व रेवसा (ता.जि.अमरावती) येथील पेढी नदीवर पूर प्रतिबंधक भिंतीचे बांधकाम करण्याबाबत

**(३४) * ७७४६२ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वलगांव व रेवसा (ता.जि.अमरावती) येथे सन २००७ व २०१२ मध्ये पेढी नदीला आलेल्या महापुरामुळे गावातील घरांचे व शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून अद्याप येथील पुरपिडींताचे पुर्नवसन पुर्णत: होऊ शकलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेढी नदीला महापुर येण्याचा धोका कायम असल्याने रेवसा येथील पेढी नदीवर पूर प्रतिबंधक भिंतींचे बांधकाम व खोलीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक १३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने सदर ठिकाणी पूर प्रतिबंधक भिंतींचे बांधकाम व खोलीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील रस्त्याची व पुलाची झालेली दुरवस्था**

**(३५) * ८३४६२ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील ईट ते पाथरुड हा रस्ता दुरुस्तीनंतर १५ दिवसात नादुरुस्त झाल्याने सदर रस्त्याचे काम संबंधित ठेकेदाराने अधिकाऱ्यांच्या संगनमताने निकृष्ट दर्जाचे करून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याने त्याबाबत चौकशी करुन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वालवड-वाल्हा (ता.भूम, जि.उस्मानाबाद) या रस्त्यावरील आंबेहोळ ओढयावरील पुलाची दुरवस्था होऊन वाहतूक ठप्प होत असल्याने सदर पुलाच्या दुरुस्तीबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच मा.पालकमंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ईट ते पाथरुड हा रस्ता व आंबेहोळ ओढयावरील पुल दुरुस्त करण्याबाबत तसेच ईट ते पाथरुड या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय हे खरे आहे.
निवेदन प्राप्त आहे. मा.श्री.राहुल मोटे, वि.स.स यांनी दिनांक २०.२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मंत्री (सा.बां.) यांना निवेदन सादर केले आहे.
(३), (४) व (५) प्रश्नांकित प्रकरणी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनाचौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात विनापरवाना गौण खनिज उत्खनन करुन गोवा राज्यात विक्री करण्यात येत असल्याबाबत

**(३६) * ७५९१० श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कळणे, करमळी, हसापूर, हणखणे या गावात गत १५ वर्षापासून विनापरवाना चिरेखाण व्यवसाय, खडी वाळू वाहतूक व गौण खनिज उत्खनन करुन विनापरवाना गोवा राज्यात विक्रीसाठी नेण्यात येत असताना सदर गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांविरोधात अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूकीचा राज्याच्या महसूल खात्यात कोणत्याही प्रकारे भरणा करण्यात येत नसल्यामुळे सदर बेकायदा चिरेखाण व्यवसाय, खडी व वाळू वाहतूक व गौण खनिज उत्खननामुळे शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदा गौण खनिज उत्खनन व चिरेखाण व्यवसाय करुन व गोवा राज्यात विक्री करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) दोडामार्ग तालुक्यातील मौजे कळणे, येथे दि.१२.०१.२०१७ रोजी तेथील स. नं. ३७ हिस्सा नं. ६४ व ७३ मध्ये माती व जांभा दगडाचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यानुसार, संबंधित जमीन मालकांना नोटीसा देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. जमीन मालकांकडून खुलासा प्राप्त होताच नियमानुसार पुढील कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे. तसेच मौजे कळणे येथे नोव्हेंबर, २०१५ मध्ये जांभा दगडाचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यावरून, संबंधितांकडून दंडाची रक्कम रू.६०,०००/- वसुल करण्यात आली आहे.

मौजे हंसापूर, हणखणे ही गावे गोवा राज्याच्या हद्दीत आहेत.

दोडामार्ग तालुका गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर पथके गठीत करण्यात आली असून, सदर पथकाद्वारे नियमित व आकस्मिकपणे तपासणी करण्यात येते. त्यानुसार दोडामार्ग तालुक्यात एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीच्या १७ प्रकरणांत रू.९६,३८,२००/- एवढा दंड आकारण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मोताळा (जि.बुलडाणा) तालुक्यातील नळगंगा व पलढग धरण येथे मत्स्यबीज उत्पादन केंद्र निर्माण करण्याबाबत

**(३७) * ८०१९५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसायास पूरेसा वाव असल्याबाबतचा जिल्हा मानव विकास अहवाल माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोताळा (जि.बुलडाणा) तालुक्यातील नळगंगा व पलढग धरण येथे मत्स्य बीज उत्पादन केंद्र निर्मितीसाठी आवश्यक जमीनीचे क्षेत्र उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव मत्स्य व्यवसाय विभागाकडून माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावानुसार नळगंगा व पलढग धरण येथे मत्स्यबीज उत्पादन केंद्र निर्मितीसाठी जमीनीचे क्षेत्र उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.
(२) मत्स्यव्यवसाय विभागाने कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, बुलडाणा यांना सप्टेंबर, २०१६ मध्ये जमीनीचे क्षेत्र उपलब्ध करून देणेबाबत विनंती केली आहे, हे खरे आहे.
(३) पाटबंधारे विभाग, बुलडाणा यांनी अधिग्रहित केलेली जमीन त्यांना आवश्यक असून अतिरिक्त जमीन उपलब्ध नसल्याचे मत्स्यव्यवसाय विभागास मार्च, २०१७ मध्ये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३८) * ७७९७० डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील नागाव-वडगांव, हेरले-वडगांव तसेच तासगांव-पेठवडगाव या रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे अपघातांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी वारंवार मागणी करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे. रस्त्यांची दुरावस्था झाली आहे . परंतु अपघातांच्या संख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) हे खरे नाही. जिल्हा परिषद कोल्हापूरकडे कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही.तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मा.आमदार डॉ.सुजित मिणचेकर यांनी दुरुस्ती बाबत मागणी केली आहे.

त्यानुसार नागांव ते मौजे वडगांव ५/२८० ते ५/४०० कि.मी. व ६/३०५ ते ६/५६० कि.मी. या लांबीतील व हेरले ते मौजे वडगांव तसेच तासगांव ते पेठवडगाव ९/३०० ते १०/२०० कि.मी. लांबीतील रस्ता दुरुस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रगतीत आहेत.

तसेच हेरले ते मौजे वडगाव रस्त्यावर कि.मी. ०/८०० ते१/२०० व ८/५०० ते ९/०० किं.मी. लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेकडे मंजूर आहे.

उर्वरीत खराब लांबीतील रस्त्याचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्हयातील ७४ पुलांची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(३९) * ८३६८६ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील जिल्हा मार्ग आणि राज्य मार्गावरील ७४ पुलांचे आयुष्य संपुष्टात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ७४ पुलांची पुनर्बांधणी करणे गरजेचे असल्याचे संबंधित विभागाने शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर ७४ पुलांची पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४०) * ८३४७३ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यात माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान हवामानात अचानक बदल होऊन काही ठिकाणी पाऊस पडला असून या अवेळी पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे तुर, द्राक्ष, कांदा व कापूस या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व पुनर्वसन व मदत कार्य मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोराडी मत्स्यबीज केंद्र (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील गैरव्यवहाराबाबत**

**(४१) * ८१५६५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी मत्स्यबीज केंद्र (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे देखभाल दुरुस्ती व साहित्य खरेदीमध्ये सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तदनुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.